महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजीनगर
विमानतळासमोर चिकलठाणा, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर - ४३१००७.

आरोग्यसेवा website-https://arogya.maharashtra.gov.in Email ID-csaurangabad3@gmail.com

जा.क्र.जिशचिछसं/नियोजन/स्वच्छता सेवा/ई-दरपत्रकसुचना/ 7500 /२०२६ दिनांक :- 30/04/2026

30 APR 2026

- जिल्हा रुग्णालय, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर या रुग्णालयाच्या स्वच्छतासेवा कामासाठी मनुष्यबळ उपलब्ध करणेसाठी दरपत्रकाची जाहिर सुचना क्र. ०१/२०२६.

जिल्हा शल्यचिकित्सक, चिकलठाणा जिल्हा रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या रुग्णालयाच्या अवैद्यकीय स्वच्छता सेवा करिता मनुष्यबळ पुरविण्यासाठी इच्छुक नोंदणीकृत सेवा पुरवठादार यांच्याकडून जिल्हा रुग्णालय, चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर या कार्यालयास विहित नमुन्यात दरपत्रके मागविण्यात येत आहे.

सदरील दरपत्रकाची जाहिरात मा.आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे https://arogya.maharashtra.gov.in व https://nrhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच या कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येत आहे. इच्छुकांनी सदरील संकेतस्थळावर संपर्क साधुन सविस्तर माहिती जाणुन घेऊन लिफाफा बंद दरपत्रके या कार्यालयास सादर करावे.

दरपत्रकाचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| दरपत्रक क्रमांक | बाब | स्वच्छतासेवेसाठी आवश्यक मनुष्यबळाची अंदाजित संख्या | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी (कार्यालयीन वेळेत) | दरपत्रक उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१ | जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथील वॉर्ड, टॉयलेट, बाथरुम, कार्यालय, रुग्णालय परिसर, इ.भागांमध्ये स्वच्छता/साफसफाई करण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेबाबत. | २८ | दि.30/०४/२०२६ ते दि.07/०5/२०२६ | दि.08/०5/२०२६ |

- मनुष्यबळाची संख्या अंदाजित असुन कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार कमी जास्त करण्याचा अधिकार जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवलेला आहे.
- कोणतेही संपुर्ण दरपत्रक अथवा त्याचा भाग कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवलेला आहे.
- शासकीय सुट्टीचा दिवस वगळता दिनांक 30/०४/२०२६ ते 07/०5/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत सायंकाळी ०६.१५ वाजेपर्यंत दरपत्रके स्वीकारले जातील. तसेच सिलबंद दरपत्रके ही जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर या नावाने या कार्यालयास सादर करावेत. दरपत्रकाच्या लिफाफयावर स्वच्छता सेवा कामासाठी मनुष्यबळ पुरवठा करणेसाठी दरपत्रक असा उल्लेख करण्यात यावा. पोस्टाने अथवा कुरिअर सेवेद्वारे उशीराने प्राप्त होणारे दरपत्रकाची जबाबदारी या कार्यालयाची नसेल.
- अटी व शर्ती मधील अ.क्र.१८ मध्ये नमुद करण्यात आलेली कागदपत्रे ही Annexure-A सोबत (अ.क्र.१ते १२) सादर करावीत. सदरील कागदपत्रे सादर न केल्यास संबंधित दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही.

(डॉ.कमलाकर मुदखेडकर)
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजीनगर



Scanned with OKEN Scanner

दरपत्रक भरणाऱ्या पुरवठादाराने आपल्या फर्मच्या लेटरहेडवर सदरील अटी व शर्ती मान्य असल्याचे बंधपत्र सादर केल्याशिवाय आपले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**दरपत्रक भरण्यापुर्वी खालील सुचना अटी व शर्ती काळजी पुर्वक वाचाव्यात**

## दरपत्रकाच्या अटी व शर्ती

१) दिनांक ३०/०४/२०२६ ते दिनांक ०७ /०५/२०२६ रोजी सांयकाळी ठिक ६.१५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत लिफाफा बंद दरपत्रके स्विकारण्यात येतील. टपालाने अथवा कुरियर सेवामार्फत पाठविलेल्या दरपत्रक विलंबाने प्राप्त झाल्यास या कार्यालयाची जबाबदारी राहणार नाही.

२) दिनांक ०८/०५/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या दालनात खरेदी समिती समक्ष दरपत्रके उघडण्यात येतील.

३) दरपत्रकातील दर सुवाच्य अक्षरात व अंकात नमुद करावे, खाडाखोड नसावी. खाडाखोड असलेले दर विचारात घेतले जाणार नाही. तसेच दरपत्रक हे वाचनीय असावे. दर सर्व करासहीत (Inclusive of all taxes) नमुद करावे. दरपत्रक सादर करते वेळी अनुज्ञेय असलेले सर्व शासकीय कर विचारात घेऊन दर भरावे. भविष्यात कोणत्याही करामध्ये वाढ झाल्यास दर वाढवुन दिला जाणार नाही, मात्र करामध्ये कपात झाल्यास मंजुर केलेल्या दरामधुन तेवढी रक्कम वजा करुनच देयकाची अदायगी केली जाईल.

४) मनुष्यबळाची संख्या अंदाजित असुन कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार कमी जास्त करण्याचा अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवलेला आहे.

५) न्युनतम दर असलेल्या पुरवठादाराने अंतिम दर स्विकारण्यात आल्याचे घोषित झाल्यानंतर रु.१०० च्या बॉन्ड पेपरवर अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे आणि त्यानुसार पुरवठा करण्यास संमती देण्याबाबतचा करारनामा लिहून द्यावा लागेल. तद्नंतर गरजेनुसार पुरवठा आदेश देण्यात येईल.

६) दरपत्रकात स्वच्छतासेवेसाठी आवश्यक मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी विवरणपत्र Annexure-B मध्ये नमुद केलेल्या निविदाकाराचा न्युनतम दर स्विकारण्यात येईल. एखाद्याचा दर स्विकारणे, याबाबतचा अंतिम निर्णय निविदा समितीचा असेल.

७) कोणत्याही स्वरुपात देयकाची आगाऊ (Advance Payment) रोख रक्कम मिळणार नाही. तसेच देयकाची अदायगी RTGS/NEFT (Cashless Transcation) पध्दतीनेच करण्यात येईल या करिता सोबतचा फॉर्म Annexure-D मध्ये आपल्या बँक खात्याची सविस्तर माहिती सादर करणे बंधनकारक राहिल.

८) दरपत्रकावरील दर पुरवठा आदेश दिनांकापासुन पुढील एक वर्षाकरीता किंवा राज्यस्तरावरील निविदा अंतिम होऊन पुरवठा होईपर्यंत किंवा दरपत्रकाच्या खरेदीच्या कमाल मर्यादेत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत वैध राहुन सेवा चालु राहतील. तद्नंतर सेवा बंद होतील. तसेच सदरील सेवा असमाधानकारक असल्यास कोणत्याही क्षणी सेवा समाप्त करण्याचा अधिकार जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजीनगर यांना राहील. तसेच अनुदान उपलब्धतेनुसार देयकाची अदायगी करण्यात येईल.

९) दरपत्रकामधील नमुद बाबींचे शासनामार्फत/वरिष्ठ कार्यालयामार्फत दरकरार (Work Order) झाल्यास सदरील दरपत्रक आपोआप रद्द केले जाईल.



Scanned with OKEN Scanner

१०) पुरवठादाराने त्यांची कोणतीही अटी किंवा शर्ती दर पत्रकात नमुद करु नये तसे केल्यास दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

११) स्वच्छता सेवेसाठी ठेवण्यात येणाऱ्या कंत्राटी मनुष्यबळास कामगार कायद्यानुसार देय वेतन व इतर लाभ अदा करण्याची जबाबदारी संबंधित सेवा पुरवठादाराची राहील. तसेच सेवा पुरवठादाराकडुन सदरील सेवेसाठी पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी कामगारांचा कोणत्याही बाबीसाठीचा शासनाप्रती नौकरी अथवा तत्सम कायद्यासाठी धारणाधिकार राहणार नाही. प्रस्तुत सेवेसाठी आपल्या स्तरावरुन बालकामगार ठेवता येणार नाही. दैनंदिन स्वच्छतासेवेसाठी लागणारे साहित्य या कार्यालयातुन उपलब्ध करुन देण्यात येईल.त्यामुळे फक्त मनुष्यबळ व त्यासंलग्न देय करासहीत रक्कम दरपत्रकात नमुद करावी.

| कायदेशीर वेतन व भत्ते | कायदेशीर वजाती (नियोक्त्याकडील) |
|---|---|
| १. किमान मुळ वेतन दर | १. ईपीएफ (मुळ वेतन व विशेष भत्याच्या एकुण रकमेच्या १३ टक्के |
| २. विशेष भत्ता | २. ईएसआयसी (मुळ वेतन व विशेष भत्याच्या एकूण रकमेच्या ३.२५ टक्के) |
| ३. घरभाडे भत्ता (मुळ वेतनाच्या ५ टक्के) | ३. व्यवसाय कर — रु.२००/- |
| ४. बोनस (मुळ वेतन व विशेष भत्याच्या एकूण रकमेच्या ८.३३ टक्के) | ४. कर्मचारी कल्याण निधी — रु.१२.५/- |
| टिप- कायदेशीर वजाती मधील अनु.क्र.१,२ व ४ या वजाती नियोक्ताकडून नियमाप्रमाणे अंशदान देण्यात येवून सदर कर्मचा-याच्या संबंधित खात्यात जमा करण्यात येईल. | |

१२) उपरोक्त प्रमाणे नमुद केलेल्या मासिक ठोक वेतन/स्थुल वेतन यावर सेवा शुल्क अतिरीक्त देय राहील, याबाबतच्या देयकाच्या रकमेवर अतिरीक्त वस्तू व सेवा कर लागू होईल.

१३) सेवा पुरवठादाराने स्वत:च्या वाटयाचे EPF, ESIC, LWF तसेच कर्मचा-यांच्या वाटयाचे EPF, ESIC, LWF चा तसेच व्यवसाय कराचा भरणा संबंधित विभागांना केल्यानंतर त्याबाबतच्या चलनाच्या प्रती सादर केल्यानंतरच पुरवठादारास त्याबाबतची प्रतीपुर्ती करण्यात येईल. तसेच सदरची चलने भरल्याशिवाय मासिक ठोक वेतन/स्थुल वेतन चे देयक अदा करण्यात येणार नाही. तसेच काही अपरिहार्य कारणास्तव सेवा पुरवठादाराचे देयक अदा करण्यास विलंब झाला तरी सेवा पुरवठादाराने कर्मचा-यांचे मानधन न थकवता विहीत वेळेत दरमहा १० तारखेच्या आत स्वनिधीतून प्रदान करणे बंधनकारक आहे.

१४) किमान वेतन कायद्यानुसार वेळोवेळी वाढ करण्यात येणा-या भत्यांनुसार कर्मचा-यांचे देयक अदा करणे सेवा पुरवठादारवर बंधनकारक राहील. तसेच EPF, ESIC, LWF यांच्या दरामध्ये शासनाकडून वेळोवेळी होणा-या सुधारीत दरानुसार अदायगी करणे सेवा पुरवठादावर बंधनकारक राहील.

१५) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:पदनि-२०१८/प्र.क्र.३२८/आरोग्य-३ मुंबई दि.१७ मार्च २०२० नुसार कामगार आयुक्त कार्यालयाकडून वेळोवेळी सुधारीत करण्यात आलेल्या विशेष/महागाई भत्याची अदायगी दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग या श्रेणीमध्ये नमुद केल्यानुसार करण्यात येईल.

१६) कोणतेही संपुर्ण दरपत्रक अथवा त्याचा भाग कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवलेला आहे.



Scanned with OKEN Scanner

१७) दरपत्रक शुल्क (ना-परतावा स्वरुपात) रु.३८००/- आणि बयाना(EMD) रक्कम रु.१९,०००/- या रकमेचे Demand Draft "Administrative Officer, District Hospital,Chhatrapati Sambhajinagar" यांच्या नावे देय असलेला Demand Draft दरपत्रकासोबत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच न्युनतम दर स्वीकारलेल्या संस्थेस ३ टक्के सुरक्षा रक्कम डी.डी द्वारे एक वर्ष वैधतेकरीता एफ.डी अथवा बंक गॅरन्टी द्वारे देणे बंधनकारक आहे.

१८) दरपत्रकासोबत स्वयं साक्षांकित (Self Attested) केलेली खालील वैध प्रमाणपत्रे सादर करावीत.

Annexure-A

| अ.क्र. | सादर करावयाची आवश्यक प्रमाणपत्रे (अनिवार्य) |
|---|---|
| १ | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये संस्था/व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (अद्यावत नुतनीकरण पाहिजे), सहकारी संस्था नोंदणी प्रमाणपत्र (लागु असल्यास) |
| २ | पॅन कार्ड व आयकर भरलेले विवरण पत्र (सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५) |
| ३ | सनदी लेखापाल यांच्याकडील संस्थेचे वार्षिक उलाढाल (Annual Turnover Certificate) प्रमाणपत्र UDIN क्रमांकासहीत |
| ४ | जी.एस.टी.नोंदणी प्रमाणपत्र व डिसेंबर २५ GST3B भरल्याचे पावती/चलन तसेच सन २०२४-२०२५ चे वार्षिक अखेर GST CLEARANCE CERTIFICATE |
| ५ | भविष्यनिर्वाह निधी( PPF) नोंदणी प्रमाणपत्र. |
| ६ | कामगार कायद्यातंर्गत वैध असलेले कामगार नोंदणी प्रमाणपत्र Valid Labour Licence Certificate |
| ७ | कामगारांच्या आरोग्य सुविधेकरीता केंद्रीय अथवा राज्य कामगार विमा योजना (ESIC)नोंदणी प्रमाणपत्र. |
| ८ | महाराष्ट्र कामगार कल्याण निधी कार्यालय नोंदणी प्रमाणपत्र व माहे मार्च २०२६ अखेर कामगार कल्याण निधी भरणा केलेली चलन. |
| ९ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र (PTRC & PTEC) Registration & Enrolment आणि सन २०२४-२५ चे वार्षिक ना-देय प्रमाणपत्र (No Dues Clearance) |
| १० | RTGS/NEFT करीता बँक खात्याची सविस्तर माहितीचा फॉर्म (Annexure-D) |
| ११ | खरेदी प्राधिकाऱ्यासोबत हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबतचे आणि संस्थेचे एकल दरपत्रक असल्याचे हमीपत्र. (Annexure-C) रु.१०० च्या बंधपत्रावर |
| १२ | शासकीय कार्यालयास अकुशल मनुष्यबळ पुरवठा केल्याचे अनुभव प्रमाणपत्र |

<u>१९) दरपत्रक सादर करण्याची कार्यपध्दती:-</u>

**१९.१) तांत्रिक लिफाफा** - Annexure-A मधील सर्व कागदपत्रे

**१९.२) दरपत्रक (वाणिज्य) लिफाफा** - Annexure-B

१९.३) वरील दोन्ही लिफाफे एका मोठया लिफाफयात टाकुन त्यावर स्वच्छता सेवेकरीता मनुष्यबळ पुरवठा करणे बाबत दरपत्रके असे नमुद करावे.

२०) वरीलपैकी तांत्रिक बाबीत पात्र ठरलेल्या सेवापुरवठादारांचे (वाणिज्य लिफाफे) दरपत्रक लिफाफे उघडण्यात येतील.

उपरोक्त अ.क्र. १ ते २० अटी व शर्ती मी वाचल्या असुन त्या मला मान्य आहेत.

स्थळ -

पुरवठादाराची स्वाक्षरी

दिनांक-

पुरवठादाराचे नांव / फर्मचा शिक्का



Scanned with OKEN Scanner

दरपत्रक भरणा-या पुरवठादाराने आपल्या फर्मच्या लेटरहेडवर सदरील माहिती सादर करावी.

रु.१००/- च्या बंधपत्रावर दरपत्रक भरण्या-या पुरवठादारांनी सादर करावयाचे हमीपत्र

# निविदाकाराचे हमीपत्र

## Annexure-C

महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भागIII/उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर २०१६ नियम क्र.४:२:५ नुसार

मी/आम्ही--------------------------------------------------------------------------------------

या हमीपत्राव्दारे लिहुन देतो की, दरपत्रक मागविणा-या खरेदी प्राधिका-याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंध नसुन हितसंबंधाबाबत संघर्ष नाही. तसेच खरेदी प्राधिक-याकडे सादर करण्यात आलेले दरपत्रक हे एकल असुन दुस-या कोणत्याही संस्थेसोबत संयुक्तरित्या किंवा संगनमताने साखळी करुन भरलेले नाही. असे आढळुन आल्यास नियमानुसार योग्य त्या दंडात्मक कार्यवाहीसाठी मी पात्र राहील.

स्थळ-

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी

दिनांक-

दरपत्रक धारकाचे नाव

फर्मचे नाव व शिक्का



Scanned with OKEN Scanner

दरपत्रक भरणा-या पुरवठादाराने आपल्या फर्मच्या लेटरहेडवर सदरील माहिती सादर करावी.

Annexure- D

Bank Details for RTGS/NEFT Payment

| | | |
|---|---|---|
| १ | Name of Firm | |
| २ | Postal Address | |
| ३ | Pin code | |
| ४ | Pan Card No. | |
| ५ | E-Mail I.D. | |
| ६ | Contact No. | |
| ७ | Mobile No. | |
| ८ | Name of Bank | |
| ९ | Bank Address | |
| १० | Brach name & Code | |
| ११ | Bank Account No. | |
| १२ | Nature of Account | |
| १३ | IFSC Code | |
| १४ | MICR Code | |

Above Information is correct as per our Record.

Date:

Seal: Sign & Stamp Of Bidder



Scanned with OKEN Scanner

दरपत्रक भरणाऱ्या पुरवठादाराने आपल्या फर्मच्या लेटरहेडवर सदरील माहिती सादर करावी.

## Annexure-B

## Quotation of Rates

प्रति
मा. जिल्हा शल्यचिकित्सक,
जिल्हा रुग्णालय, चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर.

**विषय-स्वच्छता सेवेसाठी कंत्राटी मनुष्यबळ पुरवठा करणेसाठी दरपत्रक सादर करणेबाबत.**

संदर्भ- सार्वजनिक आरोग्य विभाग, मा. आयुक्त आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द दरपत्रक सुचना क्र.०१/२०२६ व दिनांक- /०४/२०२६

महोदय,

वरील संदर्भीय विषयानुसार, जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथील वॉर्ड, परिसर,टॉयलेट,बाथरुम, कार्यालय व रुग्णालय परिसर इ.भागामध्ये साफसफाई/स्वच्छता सेवेसाठी मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यासाठी संदर्भीय दरपत्रक सुचनेच्या अनुषंगाने मी/आम्ही खालील प्रमाणे दरपत्रक सादर करीत आहेत. तसेच यासाठी आवश्यक दरपत्रक शुल्क व बयाणा रक्कमेचा डीडी सोबत सादर करीत आहे.

| अ.क्र. | सेवेचे नाव | सेवा शुल्क दर रु. (प्रतिमाह प्रति ०१ मनुष्यबळासाठी आकारणी करण्यात येणारे सेवा शुल्क दर) GST कराव्यतिरिक्त |
|---|---|---|
| १ | जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथील वॉर्ड, टॉयलेट, बाथरुम, कार्यालय, रुग्णालय परिसर, इ.भागामध्ये स्वच्छता/साफसफाई करण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेबाबत. | |

दिनांक: /०४/२०२६
स्थळ :-

सेवा पुरवठाधाराची स्वाक्षरी व शिक्का

(टिप- सदरील दरपत्रक हे बंद लिफाफयामध्ये सादर करुन अ.क्र.१८ मध्ये नमुद केलेले कागदपत्रे यासोबत जोडण्यात यावीत)



Scanned with OKEN Scanner